# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२८ /२०२५ दि. ०१/०८/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उप विभागाचे हद्दीत कासारवडवली जंक्शन ते शेंडोबा मंदिर रोड, तारांगण सोसायटी चौक परीसरात वाहनांची मोठया प्रमाणात वाढ झाल्याने तेथील सार्वजनिक वाहतूकीस व रहदारीस अडथळा व वाहतूक कोंडी निर्माण होवुन नागरीकांची गैरसोय होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए./११६/सीआर/३७/टीआर,दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करीत आहे. :–

**समांतर (Parallel) पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार |
|---|---|---|
| १ | कासारवडवली जंक्शन ते शेंडोबा मंदिर रोड, तारांगण सोसायटी चौक पावेतो प्रत्येक चौकात **२० मीटर** तसेच हॉस्पिटल, गृह संकुले, धार्मिक स्थळांची प्रवेशद्वार व बस स्टॉप सोडून रस्त्याचे फुटपाथलगत ९०० मिटर पावेतो दोन्ही बाजूस दोन चाकी व हलकी चारचाकी वाहनांकरिता | समांतर (Parallel) |

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/विशेष शाखा, ठाणे

CamScanner

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग, ठाणे
पोलीस उप आयुक्त अर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ, ठाणे वाहतूक विभाग, पोनि. कासारवडवली, कापूरबावडी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावी.

CamScanner